MHRG060010232017

नियमित दिवाणी दावा क्र. १०८/२०१७ मधील
निशाणी क्रमांक ७६ वर आदेश

सदरचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८, आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाखल केला असुन दाव्यामध्ये दुरूस्तीची परवानगी मागितली आहे.

०२. वादी यांनी असे कथन केले आहे की, दाव्यातील वादी क्र. ८ व प्रतिवादी क्र. १ मयत झाले असून बाकी वादी व प्रतिवादी त्यांचे वारस आहेत. म्हणून दाव्यामध्ये त्यांचे नावापुढे मयत असा उल्लेख करुन त्याप्रमाणे दुरुस्ती करण्यासाठी सदरचा अर्ज दाखल केला आहे.

०३. प्रतिवादीने अर्जावरच त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्जास हरकत घ ेतली आहे. त्यांनी अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

०४. अर्ज व त्यावरील म्हणणे व संबंधीत शपथपत्राचे अवलोकन केले. उभय पक्षांचा युक्तिवाद सविस्तर ऐकला. उभयपक्षांनी अर्ज व म्हणण्याच्या अनुषंगाने युक्तीवाद केल्याने पुनरावृत्ती टाळण्यासाठी तो येथे नमुद केला नाही.

०५. वादीने मागितलेली दुरुस्ती ही प्रस्थापित कायद्याला अनुसरुन आहे. सदर प्रकरणात वादी यांनी मागितलेली दुरूस्ती ही औपचारीक दुरुस्ती असून त्यास मुदतीची अथवा इतर कसलीही कायदेशीर बाधा नाही. सदर दुरूस्ती ही तांत्रिक स्वरूपाची आहे. सदर दुरूस्ती केल्याने प्रतिवादी यांचे कोणतेही अपरीमित नुकसान होणार नाही. दुरुस्ती केल्याने दाव्याचे स्वरुप बदलणार नाही. वादी क्र. ८ व प्रतिवादी क्र. १ यांच्या विव्दान विधिज्ञांनी दि.प्र.सं. आदेश २२ नियम १०अ प्रमाणे

अभिलेखावर पुरशीस दाखल करुन सदर प्रतिवादी मयत असल्याबाबत पुष्टी केली आहे. त्यामुळे दुरूस्ती केल्या शिवाय प्रस्तुतचा दावा गुणदोषावर निकाली निघू शकत नाही. त्याचप्रमाणे त्यामुळे प्रतिवादी यांच्यावर कोणताही अन्याय अथवा प्रतिवादी यांच्या हक्काचे हनन होणार नाही. वादी यांनी अर्ज दाखल करताना अप्रामाणिकपणा केला आहे असे म्हणण्यास वाव नाही. सबब दुरूस्ती करण्यास कायदयाची कोणतीही बाधा नाही. त्याअनुषंगाने मी खालील आदेश पारीत करीत आहे :

## **आदेश**

१. वादी यांचा निशाणी ७६ वरील अर्ज खालीलप्रमाणे मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांनी सदर दावा दुरूस्ती आदेश निर्गमित केल्यापासून १४ दिवसांच्या आत करणे वादी यांच्यावर बंधनकारक आहे. दावा दुरूस्ती केल्यानंतर दुरूस्त दाव्याची प्रत तात्काळ प्रतिवादी यांना देण्यात यावी. सदर दुरुस्तीचा अंमल दावा दुरुस्त केल्यानंतर पुढील प्रकरणास लागू होईल.

Digitally signed by DESHPANDE PRITESH CHANDRASHEKHAR
Date: 2022.10.07 10:47:53 +0530

( प्रितेश देशपांडे )

दि. ०१.१०.२०२२ **सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), पेण.**
पेण